MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

वर्ष : १७ अंक : ३ पाने : ८ एप्रिल-मे २०२२ E-Magazine visit us on : www.mahatransco.in Follow us on :

**प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,**

गेल्या दोन-तीन वर्षात विशेष करून कोविड महामारी सुरू झाल्यापासूनचा काळ आपल्या सगळ्यांसाठीच खूप आव्हानात्मक होता. कोविडच्या सोबतच कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील अतिवृष्टी, तौक्ते आणि निसर्ग ही चक्रीवादळे अशा एकामागोमाग एक आलेल्या नैसर्गिक आपत्तींचाही सामना करावा लागला. या आव्हानांच्या काळात महापारेषणच्या कर्मचाऱ्यांनी जनतेची निःस्वार्थ सेवा केली. तसेच वीजपुरवठ्याची उपलब्धता आणि सातत्य टिकवून ठेवण्यात ते यशस्वी ठरले. कार्यालयीन आणि वैयक्तिक स्तरावर अनेक अडचणी असतानाही

- ▸ **मॉन्सूनपूर्व कामे उरकून घ्या**
- ▸ **सांघिक भावनेने काम करा**
- ▸ **एकमेकांशी संपर्क ठेवा**
- ▸ **प्रकल्प वेळेत पूर्ण करा**

कोविडच्या काळातही आपण आपले कर्तव्य बजावत राहिलो. यामध्ये आपण एकमेकांशी असलेला संपर्क आणि टीमवर्कमुळे हे काम उत्कृष्टपणे केले.

गेल्या वर्षीच्या अतिवृष्टीचा अनुभव पाहता अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आता मॉन्सनपूर्व कामे हाती घेतली पाहिजेत. पावसाळ्यात वीजपुरवठा सुरळीत व अखंडित राहावा, यासाठी अगोदरपासूनच दुरूस्ती व देखभालीची कामे प्राधान्याने केली पाहिजेत. जेणेकरून पावसाळ्यात संपूर्ण महाराष्ट्रात वीजपुरवठा अखंडितपणे देता येईल. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपली कार्यक्षमता वाढविली पाहिजे. वरिष्ठ अधिकाऱ्यांशी समन्वय साधून कामाचे योग्य ते अचूक नियोजन केले पाहिजे. जेणेकरून ठरवून दिलेल्या वेळेत आपले प्रकल्प व कामे मार्गी लागतील, याबाबत दक्षता घ्यावी.

ऊर्जाक्षेत्र खुले झाल्यामुळे आणि खासगी क्षेत्रातील कंपन्या, बहुराष्ट्रीय संस्थांच्या आक्रमक पवित्र्यामुळे आपले अस्तित्त्व शाश्वत व निरंतर राखण्यासाठीची आव्हाने पुढील काळातही आपल्यासमोर उभी ठाकणार आहेत. उपलब्ध संसाधनांचा न्याय्य वापर करणे, कार्याच्या अंमलबजावणीतील व्यावसायिक कुशलता, प्रकल्पांचे संचलन व देखभाल, उच्चदाब, अति उच्चदाबाच्या तारांचे जाळे संपूर्ण क्षमतेने वापरणे, संपत्तीची उपलब्धता आणि शाश्वतता टिकवून ठेवणे, सक्रिय आणि प्रतिबंधात्मक चाचण्या आणि देखभालीची मानके इत्यादीसाठी आपल्या कामाच्या परिप्रेक्ष्यात नियोजनबध्द बदल करण्यासाठी आपण तयार राहिले पाहिजे. विशेषतः आधुनिकीकरणाची कास धरून तंत्रज्ञानातील बदल आपण समजावून घेतले पाहिजेत. दुर्गम भागात महापारेषणने ड्रोनच्या माध्यमातून सकारात्मक बदल नोंदवून एक चांगले पाऊल उचलले आहे.

प्रकल्प ठरवून दिलेल्या वेळेत करणे, हे एक आपल्यासमोरील आव्हान आहे. मात्र, आपल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या टीमवर्कमुळे ते प्रकल्प वेळेत पूर्ण होतील, याची मला खात्री आहे. बहुतांश पारेषण प्रकल्पांनी त्यांचा सेवाकाळ पूर्ण केला आहे किंवा लवकरच पूर्ण करणार आहेत. त्यामुळे अशा प्रकल्पांचे मानकांनुसार संचलन आणि देखभाल करणे हे एक मोठे आव्हान आहे. अभियंते आणि कर्मचाऱ्यांचे मनापासून समर्पण आणि सक्रिय सहभागातून हे साधणे आपल्याला शक्य झाले आहे.

चक्रीवादळे, अतिवृष्टी आणि त्यामुळे आलेला पूर अशा प्रकारच्या घटनांमध्ये भूतकाळात मोठी वाढ झाली होती. विविध आंतरराष्ट्रीय संशोधनांनुसार जागतिक तापमानवाढीमुळे विशेष करून अरबी समुद्रात पूर्वी जे कधीच आढळले नाही ते म्हणजे वादळांच्या प्रमाणात मोठी वाढ झाली आहे. त्यासोबतच हवामानविषयक अन्य बदलही वेगाने घडत आहेत. आग, चक्रीवादळे आणि नैसर्गिक आपत्ती यामुळे वित्तहानी, देखभाल-दुरुस्तीच्या खर्चात वाढ, वीजपुरवठा बंद पडण्याची शक्यता अशा घटना यामुळे संभवतात.

विजेच्या संदर्भातील पायाभूत सुविधांच्या अनुषंगाने असलेला धोका टाळण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आणि ऊर्जा मंत्रालयाने जारी केलेल्या आपत्ती व्यवस्थापन आराखड्याचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे.

चक्रीवादळे, पूर आदींमुळे असलेला संभाव्य धोका टाळण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या



**दिनेश वाघमारे** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

पायाभूत सुविधांमध्ये आवश्यक बदल, सुधारणा करणे आवश्यक आहे. उदा. आगीच्या धोक्यापासून वाचण्यासाठी आवश्यक उपकरणे, साधने पुरविणे यासारख्या बाबींची सध्याच्या धोरणांच्या सुसंगत पध्दतीने विचार करून पूर्तता करणे आवश्यक आहे.

अति उच्चदाबाच्या उपकेंद्राचे योग्य संचलन आणि देखभालीसाठी मनुष्यबळाच्या पुरेपूर वापरासह स्काडा हे सर्वांत महत्त्वाचे साधन आहे. ग्रिडचे व्यवस्थापन प्रभावीपणे करण्यासाठी अति उच्चदाबाच्या उपकेंद्राचा डेटा राज्य भार प्रेषण केंद्रावरही दिसणे आवश्यक आहे.

प्रकल्पांचे प्रभावी नियोजन व कार्यान्वयन करण्यासाठी महापारेषणने वित्त, विधी आणि मुख्य प्रकल्प व्यवस्थापन क्षेत्रातील व्यावसायिकांचा समावेश असलेली प्रकल्प व्यवस्थापन सल्ला सेवा संस्थेची मदत घ्यावी.

भविष्यातही महापारेषणचा लौकिक वाढवायचा आहे. त्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी एकदिलाने, समर्पित भावनेने काम करायचे आहे. सांघिक प्रयत्नांमुळेच ऊर्जा क्षेत्रात आपण सतत आघाडीवर राहू, याबाबत माझ्या मनात शंका नाही.

**शुभेच्छांसह..!**

– **दिनेश वाघमारे**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक







**मुंबई :** महापारेषणच्या वतीने महापुरुषांना अभिवादन करण्यासाठी आयोजिलेल्या सांगीतिक जयंती सोहळ्यात बोलताना महापारेषणचे संचालक (मा.सं.) श्री. सुगत गमरे. शेजारी संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मा.सं. मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड, मुख्य अभियंता श्री. शशांक जेवळीकर, मुख्य अभियंता श्री. संदीप कलंत्री व अन्य. दुसऱ्या छायाचित्रात उपस्थित अधिकारी वर्ग.

### ▶ महापुरूषांचा संयुक्त जयंती सोहळा उत्साहात

# महापारेषणतर्फे महापुरुषांना सांगीतिक मानवंदना

Follow us on :

महापारेषण कंपनीच्या वतीने महापुरुषांना अभिवादन करण्यासाठी आणि त्यांच्या कार्याला वंदन करण्यासाठी संयुक्त सांगीतिक जयंती साजरी करण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांच्या संयुक्त जयंती सोहळ्यानिमित्त महापुरुषांचे जीवनमूल्य, जीवनगाथा संगीतमय स्वरूपात सादर करण्यात आली.

या कार्यक्रमात श्री. राजेश शिर्के आणि मंडळी यांनी क्रांतिकारी ऑर्केस्ट्रा प्रस्तुत "बोधीसत्त्व गाथा" हा एक प्रबोधनाचा संगीतमय कार्यक्रम सादर केला. रंगतदार गाण्यांनी महापुरुषांचे विचार सर्वांसमोर मांडले. त्याचप्रमाणे या कार्यक्रमात स्त्री सक्षमीकरण, बदललेले राजकारण, स्त्री-पुरुष समानता, समता, लोकशाही या मूल्यांचा विचार सर्वांसमोर मांडण्यात आला.

"मी आंबेडकर"या नावाने असलेला विचारलेख महापारेषणचे जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी सर्वांसमक्ष सादर केला. या कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक प्रधान सचिव (ऊर्जा) तथा महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे होते. संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, संचालक (मा.सं.) श्री. सुगत गमरे, कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मा.सं. मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड, मुख्य अभियंता श्री. शशांक जेवळीकर, मुख्य अभियंता श्री. संदीप कलंत्री, महाव्यवस्थापक (मा.सं. आस्थापना) श्री. मंगेश शिंदे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील यांची उपस्थिती होती.



**मुंबई :** श्री. राजेश शिर्के आणि मंडळी यांनी क्रांतिकारी ऑर्केस्ट्रा प्रस्तुत "बोधीसत्त्व गाथा" हा एक प्रबोधनाचा संगीतमय कार्यक्रम सादर केला.



**मुंबई :** "मी आंबेडकर" विचारलेख सादर करताना महापारेषणचे जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे

आम्ही आता लाइव्ह आहोत!

MahaTranscoOfficial

@Mahatranscoltd

@maha_transco

**Achievement** ▶ नवी दिल्लीत १८ जूनला होणाऱ्या समारंभात पुरस्कार प्रदान होणार

# ऊर्जा श्रेणीमध्ये महाराष्ट्राला 'स्टार ऑफ गव्हर्नन्स-स्कॉच अॅवॉर्ड' जाहीर

Follow us on :

*स्कॉच स्टेट ऑफ गव्हर्नन्स रिपोर्ट २०२१ मध्ये महाराष्ट्राने ऊर्जा श्रेणीमध्ये राष्ट्रीय स्तरावर अव्वल स्थान पटकावले आहे. 'इंडिया गव्हर्नन्स फोरम'चा एक भाग म्हणून १८ जून २०२२ रोजी नवी दिल्ली येथे होणाऱ्या समारंभात महाराष्ट्राला 'स्टार ऑफ गव्हर्नन्स-स्कॉच अॅवॉर्ड इन पॉवर अँड एनर्जी' प्रदान करण्यात येणार आहे. याबद्दल ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत, प्रधान सचिव (ऊर्जा) श्री. दिनेश वाघमारे यांनी ऊर्जा विभागांतर्गत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना श्रेय देत त्यांचे अभिनंदन केले आहे.*

*स्कॉच ग्रुपच्या वतीने दरवर्षी शासन, अर्थ, बँकिंग, तंत्रज्ञान या क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्यांसाठी हा पुरस्कार दिला जातो. १८ जून २०२२ रोजी सिल्व्हर ओक हॉल, इंडिया हॅबिटॅट सेंटर, लोधी रोड, नवी दिल्ली येथे हा पुरस्कार दिला जाणार आहे.*





*महापारेषणने ड्रोनचा वापर हा विशेषतः दुर्गम भागातील अति उच्च दाब वाहिन्यांचे वेळेवर सर्व्हेक्षण व देखरेख करण्यासाठी केला आहे. मुंबई उपनगर व शहरी भागातील महत्त्वाच्या पारेषण वाहिन्यांच्या जुन्या तारा बदलून नवीन HTLS कंडक्टरचा उपयोग करून वाहिन्यांच्या क्षमतेत वाढ करण्यात आली आहे. मोनोपोल मनोऱ्यांचा वापर सुरू केला आहे. त्यामुळे वहिवाट मार्ग (Right of Way) समस्या कमी करण्यासाठी व रखडलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी नवीन पर्याय उपलब्ध झाला आहे.*

*HVDC योजना अंतर्गत एकूण १२९५४६ कृषीपंप ऊर्जान्वित केले. मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजनेंतर्गत एकूण ९९७४४ कृषीपंप बसविण्यात आले. २४ एप्रिल २०२१ पासून सुरू झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन प्रकाश योजनेंतर्गत अनुसूचित जाती, जमाती व भटक्या विमुक्त घटकांसाठी सुमारे १२१०२ घरगुती वीजजोडणी देण्यात आली.*

*कोरोना काळात ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत व प्रधान सचिव (ऊर्जा) श्री. दिनेश वाघमारे यांनी सातत्याने ऊर्जा कंपन्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शक सूचना केल्यामुळे महाराष्ट्रातील जनतेला अखंडित व विक्रमी वीजपुरवठा झाला. सुयोग्य नियोजन केल्यामुळे तौक्ते, निसर्ग चक्रीवादळ, पूरपरिस्थितीतही विद्युतपुरवठा सुरळीत ठेवला. या पुरस्कारामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांत आनंदाचे वातावरण आहे.*

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती-निवृत्ती माहे एप्रिल-मे २०२२

### नियुक्ती

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | रोहिदास निवृत्तीराव मस्के | कार्यकारी संचालक (संचलन) | सांघिक कार्यालय, मुंबई | ३१.०५.२०२२ |
| २. | सुधीर गणेश वानखेडे | मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) | सांघिक कार्यालय, मुंबई | २३.०५.२०२२ |
| ३. | मंगेश मधुकर शिंदे | महाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) | सांघिक कार्यालय, मुंबई | २३.०५.२०२२ |
| ४. | अभय किशोर रोही | उपमहाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) | सांघिक कार्यालय, मुंबई | १३.०६.२०२२ |

### निवृत्ती

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | भाऊराव तुळशीराम राऊत | मुख्य अभियंता (पारेषण) | अंबाझरी भार प्रेषण केंद्र, अंबाझरी | ३१.०५.२०२२ |
| २. | रोहिदास निवृत्तीराव मस्के | मुख्य अभियंता (पारेषण) | सांघिक कार्यालय, मुंबई | ३१.०५.२०२२ |



## जयंती विशेष

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून सारे जग ओळखते. मात्र फार कमी लोकांना हे माहित आहे की, देशात ऊर्जा क्षेत्राचा आज जो विकास झालेला आहे, त्याचा पाया डॉ. आंबेडकरांनी रचला आहे. भारताचे पहिले ऊर्जामंत्री म्हणून बाबासाहेबांच्या या कार्याची ओळख करून देत आहेत, राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत. बाबासाहेबांच्या १३१ व्या जयंतीनिमित्त विशेष लेख.**

# भारतीय ऊर्जा क्षेत्राचे शिल्पकार

दुसऱ्या विश्व युध्दाच्यावेळी संरक्षणविषयक सामुग्री तयार करणाऱ्या विविध कारखान्यांना व उद्योगांना वीजपुरवठा करण्याची गरज निर्माण झाली. त्यासाठी तत्कालीन भारत सरकारने सन १९४१ मध्ये विद्युत आयोगाची (इलेक्ट्रिकल कमिशन) स्थापना केली. १९४२ ते १९४६ या काळात बाबासाहेब व्हाईसरॉयच्या मंत्रिमंडळात मंत्री होते आणि वीज, जलसंपदा व कामगार विभागांचे खाते सांभाळत होते. जुलै १९४२ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जेव्हा कामगारमंत्री झाले तेव्हा विद्युत निर्मिती हा विभाग कामगार खात्यांतर्गतच महत्त्वाचा विभाग म्हणून कार्यरत होता. त्यावेळेस वीजवितरण आणि वीजविषयक कामकाजाचे प्रशासन यांच्याबाबत धोरण असो की माहिती काहीच अस्तित्वात नव्हती.

भारताची युध्दोत्तर पुर्नउभारणी करण्यासाठी एक पुर्नउभारणी योजना तयार करण्यात आली. त्याअंतर्गत देशात वीजनिर्मिती आणि ऊर्जाक्षेत्राच्या विकासासाठी धोरण आखणी व नियोजन करण्याची सुरूवात करण्यात आली. पुर्नउभारणी समितीच्या अंतर्गत विविध समित्या कार्यरत होत्या. एक होती शासकीय अधिकाऱ्यांची समिती व तिचे अध्यक्ष होते कामगार विभागाचे सचिव. तांत्रिक विषयांशी संबंधित तज्ज्ञांची एक समिती होती. अर्थतज्ज्ञांची एक सल्लागार समिती होती. सर्वात महत्वाची समिती होती धोरण समिती आणि कामगारमंत्री या नात्याने डॉ. आंबेडकर या समितीचे अध्यक्ष होते.

ऊर्जाक्षेत्रासमोरील प्रमुख प्रश्नांचा अभ्यास करणे आणि त्या सोडविण्यासाठी उपाययोजनांची शिफारस करणे हे या धोरण समितीचे काम होते. सप्टेंबर १९४३ मध्ये या धोरण समितीची स्थापना करण्यात आली. वीजक्षेत्राचे प्रशासन, वीजनिर्मिती व वितरण करण्यात येणाऱ्या प्रमुख अडचणी हा तेव्हा प्रमुख चिंतेचा विषय होता. या अडचणी हेरून ऊर्जाक्षेत्राच्या विकासासाठी भारत सरकारला मार्गदर्शन ठरतील अशा तत्त्वांची शिफारस करणे, ही जबाबदारी धोरण समितीवर सोपविण्यात आली होती.

२५ ऑक्टोबर १९४३ रोजी या समितीची पहिली तर २ फेब्रुवारी, १९४५ रोजी दुसरी बैठक झाली. या दोन बैठकींमध्ये पूर्णवेळ वीजनिर्मितीच्या समस्यांचा सखोल अभ्यास करण्यात आला. ऊर्जाक्षेत्राच्या विकासाचे धोरण हे देशभरातील सर्व प्रमुख घटक वा समस्या यांचा विचार करून तयार केले जावे, यासाठी देशातील सर्व राज्ये व प्रांतांची या विषयावर मते मागविण्यात आली. या सर्व अभ्यासातून डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील समितीने जे नवे धोरण आखले ते आजही ऊर्जा क्षेत्राच्या विकासासाठी केले जात असलेल्या सर्व प्रयत्नांचा पाया आहे. त्यावरून डॉ. आंबेडकरांनी ऊर्जा क्षेत्राच्या विकासासाठी केलेले काम किती श्रेष्ठ दर्जाचे आणि दूरदृष्टीचे आहे, हे लक्षात येते.

## ऊर्जाक्षेत्राच्या विकाससमोरील आव्हाने

"स्वस्त आणि पुरेशा विजेची उपलब्धता केवळ एका केंद्रीकृत व्यवस्थेव्दारे होऊ शकते. स्वस्त वीज उपलब्ध झाल्याशिवाय औद्योगिक प्रगती घडणार नाही आणि त्याशिवाय कोट्यवधी भारतीय दारिद्र्याच्या दृष्टचक्रातून बाहेर पडू शकणार नाही," ही बाबासाहेबांची भूमिका होती. बाबासाहेब विजेकडे केवळ एक तांत्रिक बाब म्हणून न पाहता दारिद्र्यमुक्तीचा आणि प्रगतीचा मार्ग म्हणून बघत होते, हे त्यांच्या द्रष्टेपणाचे वेगळेपण.

## *विजेवर मालकी सरकारची असावी की खासगी?*

खासगी मालकी असेल तर जनतेचे हित जपण्यासाठी काही अटी घालण्याची गरज आहे का? ऊर्जाक्षेत्राच्या विकासाची जबाबदारी ही

केंद्र सरकारची असावी की राज्य सरकारांची? जर केंद्र सरकारची जबाबदारी असेल तर, स्वस्त आणि मुबलक वीजपुरवठा करण्यासाठी आणि संसाधनांचा अपव्यय टाळण्यासाठी प्रशासनाची सर्वात प्रभावी पध्दत कोणती असेल? जर जबाबदारी राज्य सरकारांची असेल तर राज्यांचे प्रशासन हे आंतर-प्रांतीय मंडळाच्या अधीनस्थ असावे की नाही? या प्रश्नांचे चिंतन करून प्रभावी उपाय डॉ. आंबेडकरांनी सुचविले.



स्वातंत्र्यपूर्व काळात विजक्षेत्रात खासगी क्षेत्राची मक्तेदारी होती. आणि विजक्षेत्र हे विकेंद्रित होते. डॉ. आंबेडकर समितीने केंद्रीकृत व्यवस्था उभारण्याला प्राधान्य देण्याची आणि वीजनिर्मिती क्षेत्रात सरकारी क्षेत्राची मक्तेदारी असावी, अशी भूमिका घेतली.

अ) प्रादेशिक वा राज्य पातळीवर विद्युत क्षेत्राचा विकास करणे आणि जास्तीत-जास्त आर्थिक विकासासाठी ऊर्जेच्या वापराला प्रोत्साहन देणे आणि अशा विकासाची निरोगी वाढ

असे करण्यात आले. विद्युत आणि ग्रिड प्रणालीच्या क्षेत्रीय विकासाची आवश्यकता असल्याची भूमिकाही त्यांनी मांडली. भविष्यात अशा आंतर-प्रादेशिक ग्रिडला एकमेकांशी जोडून एक राष्ट्रीय ग्रिड तयार केले जाऊ शकते, असे झाल्यास अतिरिक्त वीज उपलब्ध असलेल्या विभागांकडून विजेची टंचाई असलेल्या विभागांकडे वीज सहजपणे पोहोचू शकेल, अशी त्यांच्या द्रष्टेपणाची ओळख देणारी शिफारस त्यांनी केली होती.

डॉ. आंबेडकर समितीने केलेल्या शिफारशींच्या आधारावर विद्युतपुरवठा कायदा १९४८ साली करण्यात आला. देशात ऊर्जेच्या विकासाचा, नियंत्रणाचा पाया याच कायद्याच्या माध्यमातून घालण्यात घाला. आज भारत संपूर्ण विद्युतीकरण झालेला देश हा गौरव प्राप्त करण्याला पोहोचला त्याला कारण

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

रोखणा-या सध्याच्या व्यवस्थेतील घटकांचे निर्मूलन करणे,

ब) देशातील अनेक महत्त्वाच्या वीज विकास उपक्रमांसाठी लागणा-या अतिरिक्त अवजड ऊर्जा उपकरणांसाठी उत्पादन क्षमता निर्माण होईल याची काळजी घेणे, या शिफारशी यात मसुद्यात करण्यात आल्या.

देशाची विजेची गरज पूर्ण करण्यासाठी संपूर्ण भारतासाठी केंद्रीय तांत्रिक ऊर्जा मंडळाची स्थापना करण्याचा निर्णय डॉ. आंबेडकरांनी घेतला. त्याची उद्दिष्टे खालीलप्रमाणे होती-

अ) संबंधित प्रांतीय आणि राज्य सरकारांशी सल्लामसलत करून देशभरात विद्युत ऊर्जा विकासासाठी योजना सुरू करणे, समन्वय साधणे आणि नव्या योजना सुचविणे

ब) वीजपुरवठा आणि संबंधित अडचणींवर मात करण्यासाठी मानकीकरण, चाचणी आणि संशोधन यासाठी अत्याधुनिक यंत्रसामुग्रीने सुसज्ज संस्था स्थापन करणे

क) वेगवान विकास आणि विजेच्या वापरास भारतीयांना प्रोत्साहित करण्यासाठी त्यांना ऊर्जेबाबत शिक्षित करणे

या धोरणामुळे विजेचा औद्योगिक वापर करण्याला प्राधान्य देण्याचे केंद्र सरकारने ठरवले. त्यानुसार विजेचा वापर वाढविण्यासाठी खतनिर्मिती प्रकल्पांची सुरूवात करण्यात आली. विजक्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विकास करण्यासाठी भारतीय अभियंत्यांना विदेशात पाठवून प्रशिक्षित करण्याचा निर्णयही घेण्यात आला आणि भारतीय अभियंत्यांना युरोप, अमेरिका, कॅनडा इत्यादी देशात पाठवण्यातही आले. यासाठी नोव्हेंबर १९४४ मध्ये "केंद्रीय तांत्रिक ऊर्जा मंडळ" स्थापन करण्यात आले ज्याचे नाव कालांतराने केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सीईए)

म्हणजे डॉ. आंबेडकरांनी आखलेले धोरण. ३१ डिसेंबर २०१३ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हे स्वप्न प्रत्यक्षात आले. 'एक राष्ट्र, एक ग्रिड आणि एक वारंवारिता' (One Nation, One Grid, One Frequency) या त्यांच्या संकल्पनेनुसार राष्ट्रीय ग्रिडची स्थापना करण्यात आली. त्यामुळे आज देशभरात कुठेही विजेची कमतरता असेल तर लगेच दुस-या भागातील अतिरिक्त वीज त्यांना उपलब्ध होते.

बाबासाहेबांनी हा देश केवळ राज्यघटनेच्या माध्यमातूनच एकत्र बांधला असे नव्हे तर विजेच्या तारांच्या रूपानेही त्यांनी भारताला एकसंघ करून प्रगतीची ऊर्जा देशात निर्माण केली. त्यामुळेच बाबासाहेब केवळ राज्यघटनेचेच नव्हे तर देशाच्या ऊर्जा विकासाचेही शिल्पकार होते, हे स्पष्ट होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घालून दिलेल्या पायवाटेवर चालत महाराष्ट्रातील सर्व वीजग्राहकांना वेगवेगळ्या उपाययोजना करून स्वस्त वीज पुरवण्यासाठी सर्वतोपरी जबाबदारी प्रामाणिकपणे मी करीत आहे. हे एक कठीण कार्य आहे, याची मला कल्पना आहे. परंतु मला खात्री आहे की, एक पध्दतशीर, व्यावसायिक दृष्टिकोन अवलंबुन, संसाधनांचा सर्वोत्तम वापर करून, काटेकोर उपाययोजना आखून, अत्याधुनिक साधनांचा वापर करून, कारभारात पारदर्शकता आणून आणि सर्व भागधारकांना त्यात सामील करून आत्मविश्वासाने मी माझ्या प्रयत्नात यशस्वी होईल!

**- डॉ. नितीन राऊत**
(लेखक राज्याचे ऊर्जामंत्री आहेत.)

## अभिवादन ज्ञानसूर्याला

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी



मुंबई : महापारेषण कंपनीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, संचालक (मा.सं.) श्री. सुगत गमरे, कार्यकारी संचालक (संचालक) श्री. रोहिदास मस्के, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य अभियंता श्री. सुनील सूर्यवंशी, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव.

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३१ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

सुरुवातीला महापारेषणचे संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. याप्रसंगी संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप, संचालक (प्रकल्प) श्री. नसीर कादरी, संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे, कार्यकारी संचालक (संचालक) श्री. रोहिदास मस्के, मुख्य महाव्यवस्थापक (मा. सं.) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य अभियंता श्री. सुनील सूर्यवंशी, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव, व्यवस्थापक श्री. महेश आंबेकर उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मौलिक विचार सांगितले.

महाराष्ट्रातील महापारेषणच्या कार्यालयात ठिकठिकाणी संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. काही अधिकाऱ्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुस्तकांचे वाचन केले. तर काही कर्मचाऱ्यांनी भीमगीते गाऊन अनोख्या पध्दतीने जयंती साजरी करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्री. सुशील घाडगे यांनी मानले.

---

## जय बसवण्णा

# महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी



मुंबई : महापारेषणमध्ये महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी महापारेषणचे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य अभियंता श्री. संदीप कलंत्री, राजशिष्टाचार अधिकारी सतिश जाधव, व्यवस्थापक (मा.सं.) श्री. महेश आंबेकर व अन्य.

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

सुरुवातीला महापारेषणचे मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. यावेळी मुख्य अभियंता श्री. संदीप कलंत्री, राजशिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार व्यवस्थापक (मा.सं.) श्री. महेश आंबेकर यांनी मानले.

---

Like Comment Share MahaTranscoOfficial @Mahatranscoltd @maha_transco





**मुंबई :** येथील सांघिक कार्यालयात ६२ वा महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी ध्वजारोहण करताना महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे.

# महाराष्ट्र दिन व कामगार दिन महापारेषणमध्ये उत्साहात साजरा

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत ६२ वा महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सुरुवातीला महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संचालक (संचलन) श्री. अनिल कोलप, संचालक (वित्त) श्री. अशोक फळणीकर, संचालक (मा.सं.) श्री. सुगत गमरे, कार्यकारी संचालक (संचलन) श्री. रोहिदास मस्के, मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. सुधीर वानखेडे, मुख्य अभियंता श्री. शशांक जेवळीकर, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. भूषण बल्लाळ, मुख्य अभियंता श्री. सुनील सूर्यवंशी, राजशिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव व अन्य अधिकारी उपस्थित होते.



**मुंबई :** महापारेषणच्या लायब्ररीचे उद्‌घाटन करताना प्रधान सचिव (ऊर्जा) तथा महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे. याप्रसंगी सर्वश्री अनिल कोलप, अशोक फळणीकर, सुगत गमरे, रोहिदास मस्के, सुधीर वानखेडे, भूषण बल्लाळ.

# उत्पत्ती-स्थिती-लय



ही अवस्था आहे, ती कुणालाच चुकली नाही. जगाच्या निर्मितीपासून ते अंतापर्यंत ही अवस्था राहणार आहे. जगज्जेते येऊन गेले. त्यांना पण ही अवस्था चुकली नाही. कोणतीच गोष्ट या पृथ्वीतलावर स्थायी नाही. त्यामुळे जे आहे, त्यात आपण समाधानी राहिले पाहिजे, ही अध्यात्मिक विचारधारा प्रबळ ठरते. यासाठी आपण प्राप्त स्थितीचा आनंद घेऊन व्दिगुणित केला पाहिजे. स्थिती चांगली आहे म्हणून त्याचा गर्व न करता त्यासाठी आपण कृतज्ञता व्यक्त करून ती स्थिती अधिक चांगली करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कारण, असलेली चांगली स्थिती कायमस्वरूपी राहणार नाही. त्याला उत्पत्ती-स्थिती-लय ही संकल्पना लागू आहे. हीच बाब स्थिती आव्हानात्मक असेल तर त्यालाही लागू आहे. त्यामुळे त्या आव्हानात्मक स्थितीचा सकारात्मक पध्दतीने मुकाबला करून ती स्थितीसुध्दा कायम नाही. त्याला सुध्दा उत्पत्ती-स्थिती-लय या संकल्पनेचा सिध्दांत लागू आहे. याचे भान ठेवून त्या आव्हानात्मक स्थितीचा सामना केला पाहिजे.

उत्पत्ती-स्थिती-लय ही संकल्पनाच सृष्टीचा खरा आत्मा आहे. कोणतीही गोष्ट कायमस्वरूपी नसल्यामुळे काळाला उगम व अंत नसतो. आपण जन्माला येतो, त्यालासुध्दा ही संकल्पना लागू होते. त्यामुळे ज्यावेळेस आपण या स्थितीमध्ये येतो व जोपर्यंत आपण या स्थितीमध्ये राहतो. त्या कालावधीबद्दल मनात कृतज्ञता व्यक्त करून त्या कालखंडाचा आपणाला 'महोत्सव' करता आला पाहिजे. हा खरा सुंदर सुवर्णकाळ असतो. आनंद घ्या, आनंद द्या...मदत करा, जीवन घडवा तसेच इतरांनाही घडविण्यात आपले योगदान द्या. बहुतांश लोकाना असे वाटते की, सर्व बाबी या कायमस्वरूपी, चिरस्थायी व आपल्याच मालकीच्या आहेत. त्यामुळे ते अवाजवी मोहाच्या बंधनात अडकून राहतात. मोहमाया आणि प्रेम या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत.

मोहबंधनात अडकविते ते प्रेम. या विषयावर विस्तृतपणे आपण नंतर बोलू स्वतंत्रपणे. कारण, हा विषय समजून सांगण्याच्या प्रयत्नात आजचा जो महत्त्वाचा विषय आहे उत्पत्ती-स्थिती-लय तो मागे पडेल. फक्त एक सांगतो, प्रेम ही जगातील सर्वात मोठी शक्ती व स्वार्थ (मोह) ही सर्वात मोठी कमजोरी आहे. म्हणून अनेक अध्यात्मिक गुरू आपल्याला आहे त्या स्थितीमध्ये राहण्यास सांगतात. 'जीवनात ही घडी अशीच राहू दे...!' या गाण्याच्या ओळीसुध्दा आपल्याला हेच सांगत आहेत. सुख-दुःख, वेदना-संवेदना, ऊन-सावली, दिवस-रात्र, जन्म-मृत्यू स्थायी नाही. यासाठी त्या-त्या वेळेस त्या-त्या स्थितीचा आनंद घेता आला पाहिजे. तो क्षण जगा, जगवा. त्या स्थितीचं स्मरण आपल्याला लयाच्या काळात आनंद देण्यासाठी उपयोगी ठरत असते. अशा अनेक आठवणींच्या स्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न करा. 'स्तोत्रात इंद्रिय अवघी, गुणगुणती दुःख कुणाचे, हे सरता संपत नाही...चांदणे तुझ्या स्मरणाचे...' ही कवी ग्रेस यांच्या काव्यपंक्ती जणू याच गोष्टीचा पुष्टी देत असावीत. अनेकांच्या स्मरणात जो राहतो, तो परमश्रेष्ठच ठरतो. अनेकांच्या मनात जो चैतन्य निर्माण करतो, तोच खरा सिध्दपुरूष ठरतो. कैवल्य, चैतन्य निर्माण करण्याची क्षमता ही दैवी भेट ठरते. संत तुकाराम महाराजांनी म्हटल्याप्रमाणे 'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले, तोचि साधू ओळखावा. देव तेथेचि जाणावा', असे अनेक देवपुरूष, युगपुरूष, विधाता आपल्याला लाभले. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या जीवनात कार्यसिध्दतेमुळे अनेकांच्या स्थितीमध्ये, जीवनामध्ये सकारात्मक व आमुलाग्र बदल केला आहे. आपण त्यांचे अनुकरण नाही करू शकत. परंतु, त्यांचे आचार व विचार अंगी बाळगण्यासाठी आपण जाणीवपूर्वक प्रयत्न जरूर केला पाहिजे. आपल्या कार्यामुळे कुणाची स्थिती बदलेल व आपण त्यांच्या स्मरणात कायम राहू, त्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत.

**शुभेच्छांसह..!**

**- सुगत गमरे**
**संचालक (मानव संसाधन)**

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

MahaTranscoOfficial @Mahatranscoltd @maha_transco

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.